वर्ष-०७ | अंक-२९ | मुंबई, मंगळवार १५ ते २१ जून २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक •कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

PG 2 तलावावर गाडी धुण्यासाठी गेलेल्या मुलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी अंत


3 → वैनगंगा नदीत ट्रक कोसळला, दोघांचा जागीच मृत्यू एकजण जखमी

मुख्यमंत्र्यांच्या दिल्ली दौऱ्याबाबत विनायक मेटेंनी केला घणाघाती आरोप ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

# किल्लय़ांचे टप्प्याटप्प्याने संवर्धन-मुख्यमंत्री

## पहिल्या टप्प्यात तोरणा, शिवनेरी, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुधागड, राजगड या किल्लय़ांचे संवर्धन करण्यात येणार आहे



मुंबई : राज्यातील गड-किल्लय़ांचे पावित्र्य जपून त्यांचे टप्प्याटप्प्याने संवर्धन करण्याचे काम राज्य सरकारने हाती घेतले असून पहिल्या टप्प्यात तोरणा, शिवनेरी, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुधागड, राजगड या किल्लय़ांचे संवर्धन करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी दिली.

राज्यातील दुर्गप्रेमी, दुर्गसंवर्धक, गिर्यारोहक यांनी या संदर्भातील सूचना आणि प्रस्ताव मुख्यमंत्री सचिवालयातील संकल्प कक्षास त्वरित पाठवाव्यात, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्र्यांनी राज्यातील २५० दुर्गप्रेमी आणि गिर्यारोहक यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला व त्यांच्या सूचना ऐकल्या. या बैठकीचे संचालन आदेश बांदेकर, मिलिंद गुणाजी यांनी केले तर अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाचे अध्यक्ष उमेश झिरपे, गिरीश टकले या प्रसिद्ध गिर्यारोहक आणि दुर्गप्रेमींनी आपले विचार सर्वाच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात मांडले. गडकिल्लय़ांचे पावित्र्य जपत, त्यांच्या ऐतिहासिक आणि पुरातत्त्व वारशाला कोणताही धक्का न लावता आपल्याला हे काम करायचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. पहिल्या टप्प्यात तोरणा, शिवनेरी, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुधागड, राजगड या किल्लय़ांचे संवर्धन करण्याचे नियोजन असून दुर्गप्रेमी आणि अभ्यासकांचा सहभाग असलेली एक मध्यवर्ती समिती स्थापन करून सर्वाच्या सूचना आणि विचाराने आराखडा तयार करा, असेही मुख्यमंत्री म्हणाले. गड-किल्लय़ांचे संवर्धन करणार म्हणजे नक्की काय करणार आणि त्यांचे पावित्र्य अबाधित ठेवून ते कसे करायचे त्याचा प्रथम सविस्तर विचार करा. उत्तमोत्तम छायाचित्रे, ड्रोनसारख्या साधनांचा उपयोग करून काढलेल्या ध्वनीचित्रफिती या माध्यमांतून जगभरात शिवरायांच्या गड-किल्लय़ांची महती जगभर पोहोचवली पाहिजे, असेही मुख्यमंत्री म्हणाले. गड-किल्यांच्या पायथ्याशी त्यांची संपूर्ण माहिती देणारे केंद्र किंवा संग्रहालय उभारण्यात यावे, केंद्र आणि राज्याकडील किल्लय़ांच्या वर्गवारीनुसार ...पान २ वर...

# बनावट पत्रकारांवर एफआयआर घेण्यात येईल

## माहिती व प्रसारण राज्यमंत्री यांची पत्रकार परिषद




नवी दिल्ली : भारताच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाने बनावट पत्रकारांवर शिक्कामोर्तब करण्याची तयारी केली आहे. आज दुपारी आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी बोलताना माहिती व प्रसारण राज्यमंत्री कर्नल राजवर्धनसिंग राठोड म्हणाले की, देशभरात जे प्रेस आयडी घेतात त्यांच्यावर त्वरित चौकशी सुरू होईल. या प्रकरणात दोषी आढळलेल्या व्यक्तीस त्वरित कारवाई करून अटक केली जाईल. कर्नल राजवर्धनसिंग राठोड म्हणाले की, काही दोषी लोकांमुळे चांगल्या, खऱ्या. आणि प्रामाणिक पत्रकारांची प्रतिमा खराब होत आहे. आणि त्यांचे कामात अडथळे निर्माण होत आहे. अधिक माहिती देताना राठोड म्हणाले की, बनावट प्रेस आयडी वाटप करणे आणि बनावट पत्रकारांना कामावर ठेवणे ...पान २ वर...

# ब्लॅकमेल करत महिला पोलीस अधिकाऱ्यावर लैंगिक अत्याचार



ब्लॅकमेल करत महिला पोलीस अधिकाऱ्यावर लैंगिक अत्याचार मुंबई, मुंबईतील एका महिला पोलीस अधिकाऱ्याला ब्लॅकमेल करत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. मागील काही ...पान २ वर...

# ठाण्यातील 20 'आपला दवाखाने' बंद



ठाणे : शहरातील २० ठिकाणी 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' उपक्रमाद्वारे ...पान २ वर...

# पुणे: 'ती' बेपत्ता मुलगी सापडली; आरोपीच्या तपासात धक्कादायक बाब उघड




पुणे:कात्रज येथून शनिवारी बेपत्ता झालेली अल्पवयीन मुलगी रविवारी पुणे रेल्वे स्थानकात सापडली. या मुलीला भीक मागायला लावायचे, या उद्देशाने तिचे

अपहरण करण्यात आले होते, अशी धक्कादायक बाब पोलीस तपासातून उघड झाली आहे. या प्रकरणी सर्जेराव उमाजी बनसोडे याला पोलिसांनी अटक केली आहे. ( Pune 8 Year Old Girl Kidnapped Latest News )


कात्रज येथून शनिवारी ही अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याने एकच खळबळ उडाली होती. या मुलीच्या पालकांनी या बाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यावरून अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी सोशल मीडियावर मेसेज पाठवून, मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली होती.

कात्रज येथून शनिवारी ही अल्पवयीन ...पान २ वर...

# 'प्रभूरामाच्या नावे घोटाळा होत असेल तर...', राम मंदिर प्रकरणात संजय राऊतांची मोठी मागणी

मुंबई : धर्मनगरी अयोध्येत राम मंदिर बनवत असलेल्या श्री रामजन्म तीर्थ क्षेत्र ट्रस्टवर गंभीर भ्रष्टाचाराचा आरोप करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमिवर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनीही भाजपवर निशाणा साधला आहे. ट्रस्टची स्थापना करताना सगळ्या भाजपच्या सदस्यांना घेण्यात आलं आहे. आमच्या पक्षाचा एकही सदस्य नाही. यामुळे जर घोटाळा झाला असेल तर त्याची चौकशी करावी आणि ट्रस्टकडून खुलासा करण्यात यावा असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

राम मंदिराच्या निर्माणासाठी जगभरातून निधी आला. हा निधी लोकांनी श्रद्धेपोटी दिली आहे. अनेक ठिकाणाहून देणग्या गोळा केल्या गेल्या. राम मंदिर हा श्रद्धा आणि आस्थेचा विषय आहे घोटाळ्याचा विषय नाही. त्यामुळे जर निधीचा गैरवापर होत असेल तर ट्रस्टच्या प्रमुखांनी खुलासा करावा अशी



मागणी यावेळी संजय राऊत यांनी केली आहे. ट्रस्टने समोर येऊन आरोपांचा खुलासा करावा इतकंच नाहीतर यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत आणि भाजपच्या नेत्यांनी खुलासा करणं गरजेचं आहे, असंही यावेळी राऊत म्हणाले.

**काय आहे राम मंदिर घोटाळा?**

अयोध्येत राम मंदिर बनवत असलेल्या श्री रामजन्म तीर्थ क्षेत्र ट्रस्टवर गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत. आम आदमी पार्टी (आप) आणि समाजवादी पक्षाने श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले. यामध्ये असं म्हटलं आहे की, 'दोन कोटी रुपयांची जमीन फक्त ५ मिनिटानंतर 18.5 कोटींमध्ये खरेदी करून मोठा घोटाळा केला आहे.

आप आणि एसपी यांनी आता यासंदर्भात अंमलबजावणी संचालनालय आणि सीबीआयमार्फत चौकशीची मागणी ...पान २ वर...

# जलसमाधी मिळालेल्या त्या कारला 12 तासांनंतर बाहेर काढण्यात यश

रविवारी सकाळी ही कार विहिरीत बुडाली होती. घाटकोपर येथील एका इमारतीतील पार्किंगमध्ये खड्डा तयार होऊन त्यात चक्क कार बुडाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. या इमारतीच्या परिसरात एक विहीर होती. विहिरीच्या अर्ध्या भागावर आरसीसी करुन ती विहीर झाकण्यात आली होती. त्या आरसीसी केलेल्या भागावर सोसायटीतील रहिवाशी कार पार्क करत होते.



सोशल मीडियावर कारचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर कार विहिरीतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरु होते. पंपाच्या सहाय्याने विहिरीतल पाण्याचा उपसा करण्यात आला होता.

त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने ही कार बाहेर काढण्यात आली. कारमध्ये कोणीही नसल्याने घटनेत कोणतीही मनुष्यहानी झालेली नाही, तसेच कोणीही जखमी झालेले नाही. कार खड्ड्यात बुडाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मुंबई महापालिकेवर जोरदार टीका करण्यात आली होती. यावर मुंबई महानगरपालिका आपत्कालीन व्यवस्थापन खात्याकडून अधिक माहिती देण्यात आली आहे व या घटनेशी महापालिकेचा कोणताही संबंध नसून ही एका खासगी सोसायटीतील घटना असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, भाजप नेते किरीट सोमय्या यांनी या घटनेचा संबंध मुंबई महापालिकेच्या नालेसफाईशी जोडत निशाणा साधला होता.

हीच का मुंबई महापालिकेची नालेसफाई?, असा सवाल या निमित्ताने सोमय्या यांनी केला होता.

# शेतकरी पुन्हा रस्त्यावर उतरणार, दूध दरासाठी 17 जूनला राज्यभर मोर्चे



अहमदनगर: लॉकडाउनचा गैरफायदा घेत दूध संघांनी दुधाचे भाव पाडल्याचा आरोप करीत दूध उत्पादकांनी आंदोलन पुकारले आहे. यासाठी १७ जून रोजी राज्यातील सर्व तहसिदार कार्यालयांवर मोर्चे काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती भारतीय किसान सभेचे सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी दिली. कडक निर्बंध शिथील झाल्यानंतर आता पुन्हा आंदोलने सुरू झाली आहेत. त्यात शेतकरी आंदोलनाचीही भर पडणार आहे. या आंदोलनासंबंधी माहिती देताना डॉ. नवले यांनी सांगितले की, 'लॉकडाउनच्या काळात मागणी घटल्याचे कारण देत खासगी व सहकारी दूध संघांनी दूध खरेदीचे दर दहा ते पंधरा रुपये प्रति लिटरने कमी केले. ग्राहकांसाठीचे विक्रीदर मात्र तसेच ठेवत शेतकरी व ग्राहकांची प्रचंड लूटमार केली आहे. किसान सभा व दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने याविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. खरीप हंगाम तोंडावर असताना राज्य सरकारने हंगामाच्या ...पान २ वर...

# 'सुशांतनं आत्महत्या केली नव्हती तर मग त्याचा खुनी कोण?'

मुंबई:अभिनेता सुशांतसिंह राजपूत यांच्या मृत्यू प्रकरणावरून भारतीय जनता पक्षानं महाविकास आघाडी सरकारला घेरलं होतं. ही आत्महत्या नसून खून असल्याचा आरोप करत सीबीआय चौकशीची मागणी करण्यात आली होती. सरकारमधील एका मंत्र्यावरही आरोप झाले होते. बॉलिवूडमधील काही सेलिब्रिटींचीही साथ भाजपला मिळाली होती. कालांतरानं हे प्रकरण सीबीआयकडं गेलं. मात्र, सुशांतच्या आत्महत्येला वर्ष उलटल्यानंतरही सीबीआय अद्याप कोणत्याही निष्कर्षापर्यंत आलेली नाही. त्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसनं भाजप व सीबीआयवर निशाणा साधला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते तथा राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले आहेत. 'सुशांतसिंह राजपूतच्या आत्महत्येच्या नावावर भाजपला बिहार निवडणूक लढवायची होती. म्हणूनच सीबीआयला पुढं करून महाराष्ट्र सरकारला बदनाम करण्याचं कटकारस्थान रचण्यात आलं होतं, असा थेट आरोप मलिक यांनी केला आहे.

'सुशांतच्या आत्महत्येचा तपास मुंबई पोलीस करत असतानाच राजकीय कारणामुळं या प्रकरणाचा गुन्हा बिहार सरकारनं दाखल केला व ही केस सीबीआयकडे दिली होती. परंतु, निष्पन्न काय झालं? एक वर्ष उलटूनही सुशांतसिंहच्या आत्महत्येचा तपास पूर्ण झालेला नाही. सुशांतनं आत्महत्या केली नव्हती असं म्हटलं जात असेल तर मग त्याचा खुनी कोण हे सीबीआयनं जनतेला सांगितलं पाहिजे,' अशी मागणी मलिक यांनी केली आहे.

पोलीस बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार १५ ते २१ जून २०२१

# तलावावर गाडी धुण्यासाठी गेलेल्या मुलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी अंत



तलावावर गाडी धुण्यासाठी गेलेल्या दोन मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव पोलिस स्टेशन हद्दीतील गोळेगाव येथे घडली. या घटनेबाबत शिल्लेगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोळेगाव येथील शाहरुख अमीर सय्यद (१७) व सादिक मुनीर शेख (११) हे दुपारी दोन वाजेच्या सुमारास गावालगत असलेल्या तळ्यात गाडी धुण्यासाठी गेले होते. सादिक मुनीर शेख याचा पाय घसरून तो तळ्यात पडला. त्याला वाचवण्यासाठी शाहरुख अमीर सय्यद हा गेला असता पोहता येत नसल्याने दोघांचाही बुडून मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी शिल्लेगाव पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक अमोल ढाकणे, कॉन्स्टेबल अमोल करवंदे यांनी धाव घेतली. पुढील तपास पोलिस करत आहेत.

# आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त एक रुपयात पेट्रोल; लोकांनी लावल्या लांबच लांब रांगा



पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त डोंबिवलीत एका रुपयात पेट्रोलची जाहिरात एका रात्रीत सर्वदूर पसरली आणि तब्बल १०२ रुपयांत मिळणारे पेट्रोल एक रुपयात मिळणार असल्याने कल्याण-डोंबिवलीसह

आजूबाजूच्या अगदी मुंबईतून नागरिकांनी रविवारी पहाटेपासून पेट्रोलपंपावर रांगा लावल्या. तब्बल दीड किमीपर्यंत लागलेली रांग पाहून आयोजकांची भंबेरी उडाली. यानंतर घाईगडबडीत एका व्यक्तीला एक लिटर पेट्रोल आणि केवळ २५० दुचाकीचालकांनाच ते मिळणार असल्याचे बॅनर लावण्यात आले.

त्यामुळे पेट्रोलसाठी स्वत:चे दोन लिटर पेट्रोल जाळून आलेल्या नागरिकांची घोर निराशा झाली. या प्रकरणी वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरत नागरिकांना आमिष दाखवत फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी नागरिकांनी पोलिस आयुक्तांकडे पोर्टलवरून केली आहे.

युवानेते आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त डोंबिवलीतील ग्रामीण विधानसभा संघटक योगेश म्हात्रे यांनी भाजप सरकारचा निषेध करण्यासाठी एक रुपयात पेट्रोल देणार असल्याची जाहिरात केली होती.

काही तासांत ही जाहिरात सर्वदूर पसरली.

सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत १०२ रुपये लिटर असलेले पेट्रोल एक रुपयात मिळणार म्हणून शहरातील आणि शहराबाहेरील दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांनी पहाटेपासून रांग लावली होती. तब्बल १.५ किमीपर्यंत लांब रांगा लागल्याने चौकासह रस्त्यावर मोठी वाहतूककोंडी झाली होती. पेट्रोलसाठी जवळपास ७०० हून अधिक वाहनचालक रांगेत असलेले पाहून अचानक आयोजकांनी केवळ २५० दुचाकीचालकांना एक रुपयात केवळ एक लिटर पेट्रोल दिले जाणार असल्याचे बॅनर चिकटवले आणि पाच तासांपासून रांगेत उभे असलेल्या वाहनचालकांची घोर निराशा झाली. या प्रकरणी अनेकांनी पोलिस आयुक्तांकडे तक्रार करत आयोजकांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांना अजूनही वेतनाची चिंता



एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी तसेच अन्य कामासाठी अखेर राज्य सरकारनेच ६०० कोटी रुपयांची मदत देण्याची घोषणा केली. घोषणा झाली असली, तरीही एसटीच्या कर्मचाऱ्यांच्या खात्यावर पगार पडला नसल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. निर्बंधांमुळे तीन महिन्यांपासून एसटी बसमधून प्रवासी वाहतूक बंद होती. ही वाहतूक बंद असल्यामुळे एसटीला मिळणारे उत्पन्न बंद झालेली होती. या काळात एसटीतून अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांची वाहतूक सुरू होती. एसटीने माल वाहतुकीचाही प्रयोग केला. मात्र, मालवाहतुकीतून एसटीला अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. शिवाय, सरकारकडून देण्यात सहायता निधीतून एप्रिलचा एसटी कर्मचाऱ्यांचा शेवटचा पगार करण्यात आलेला होता. मेमध्येही लॉकडाउन सुरू होते. दोन जूनपासून बससेवा सुरू करण्यात आली. बससेवा सुरू झाल्यानंतर या बसमधून प्रवासी कमी असल्यामुळे एसटीला अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. एसटीकडे पैसा नसल्याने मे महिन्याचा ७ जून रोजी होणार पगारही थांबला आहे.

आर्थिक कोंडी सापडलेल्या एसटीला राज्य सरकारने मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी विभागाला सहाशे कोटी रुपये देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सहाशे कोटी रुपये देण्याची घोषणा झाल्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांचा पगार होईल. अशी शक्यता निर्माण झालेली होती. मात्र, घोषणेच्या तीन ते चार दिवसांनंतरही एसटी कर्मचाऱ्यांना पगार मिळालेला नाही.

# औरंगाबाद प्रशासन वाळू चोरांवर कारवाई करणार



'पैठण तालुक्यातील हिरडपुरी गावातून वाळू चोरीच्या तक्रारी आल्या आहेत. प्रशासनाकडून कठोर कारवाई करणार आहे. पण, ग्रामस्थांनी दक्ष नागरिकाची भूमिका बजावून प्रशासनास माहिती देण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. गावातील प्रत्येकाने 'कलेक्टर मित्र' बनून सहकार्य करावे,' असे आवाहन जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी केले. पैठण येथील मोक्ष घाट, नवेगाव, भिवरन्याय आणि हिरडपुरी येथे नदीपात्रातील वाळू चोरीच्या तक्रारी वाढल्या आहेत. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी रविवारी गोदापात्रातील गावांना भेट देऊन पाहणी केली. अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. ग्रामस्थांनीसुद्धा वाळू उपसा करणाऱ्यांच्या विरोधात एकत्र येऊन गावाच्या विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे चव्हाण यांनी ग्रामस्थांना सांगितले. चव्हाण यांनी महसूल आणि पोलिस प्रशासनास योग्य सूचना केल्या. घरकुल, वीज जोडणी, कृषी पंप जोडणी, बचत गटांना साह्य, कौशल्य विकासातून प्रशिक्षण, पाणीपुरवठा, अन्नधान्य पुरवठ्याबाबत ग्रामस्थांशी संवाद साधला. चव्हाण यांनी हिरडपुरीच्या नदी पात्रात अवैधरित्या जमा करण्यात आलेला वाळू साठा जप्त करण्याचे आदेश दिले. या वेळी उपविभागीय अधिकारी स्वप्नील मोरे, तहसीलदार चंद्रकांत शेळके, पोलिस निरीक्षक किशोर पवार, गोरख भामरे उपस्थित होते.

# रस्त्यालगत उभ्या असलेल्या ट्रकला दोन वाहनं धडकली; तिहेरी अपघातात एक ठार



जालना: अंबड चौफुलीपासून काही अंतरावर सोमवारी सकाळी पुन्हा अपघात झाला आहे. रोडलगत उभ्या असलेल्या ट्रकला वाहने धडकून विचित्र अपघात झाला आहे. या तिहेरी अपघात एक जण जागीच ठार झाला असून ५ जण गंभीर जखमी आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

अंबड चौफुलीकडून मंठा चौफुलीकडे जाणाऱ्या वळण रस्त्यावर रोडलगत एक ट्रक उभा होता. या ट्रकवर पहाटे पाच वाजेच्या सुमारास पाठीमागून एक आयशर वाहनानं जोरदार धडक दिली.

त्यापाठोपाठ पाठीमागे असलेली भरधाव कार देखील जोरदार धडकली. हा अपघात इतका भीषण होता की तीनही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तर, कार मधील एक प्रवासी जागीच ठार झाला आहे. तसेच अन्य काहीजण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने नजीकच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

रस्त्याच्या बाजूला उभ्या ट्रक (क्रमांक एमएच १५ सीके १५५५) ला आयशर ट्रकने पाठीमागून धडक दिली. तर आयशरला मागच्या कार जोरात धडकली. यात कार मधील एक व्यक्ती जागेवर ठार तर तीन वर्षाचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. जालना शहरालगत अंबड ते मंठा वळण रस्त्यावर सोमवारी पहाटे पाचच्या दरम्यान हा अपघात झाला.

नाशिकहून नांदेडला जाणाऱ्या ट्रकचे टायर रात्री दिड वाजेच्या सुमारास फुटल्यानंतर संबधित ट्रक ड्रायव्हरने ट्रक रस्त्याच्या बाजूला उभा करून तो टायर बदलत होता तेवढ्यात याच मार्गाने जाणाऱ्या आयशर ट्रकने या उभ्या ट्रकला पाठीमागून धडक दिली यात आयशरचा ड्रायव्हर किरकोळ जखमी झाला. याच अवस्थेत उभ्या आयशर ट्रकला नाशिकहून सिंदखेडराजाला जात असलेल्या कार ( क्रमांक एमएच १५जीव्ही १४०४) ने पाठीमागून भरधाव वेगात धडक दिली. यात किरण संजय धोंगडे( वय २५, रा. खैरखेडा, ता.सिंदखेडराजा जि बुलडाणा) हे जागेवर ठार झाले तर अर्थव हा तीन वर्षाचा मुलगा गंभीर जखमी झाला.

कार मधील पाच प्रवासी किरकोळ जखमी आहेत.

# '...तर यशोमती ठाकूर मुख्यमंत्र्यांना जाब विचारायलाही मागे-पुढे पाहणार नाहीत'

अमरावती: काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे सध्या विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री यशोमती ठाकूर यांचा रणरागिणी असा उल्लेख करत त्यांच्या कामाचं कौतुक केलं आहे.

नाना पटोले सध्या विदर्भ दौऱ्यावर असून मतदारसंघात जाऊन ते कार्यकर्त्यांसोबत संवाद साधत आहेत. त्यावेळी त्यांनी महिला व बालकल्याण मंत्री यशोमती ठाकूर यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांची कौतुक केलं आहे. तसंच, जनतेच्या प्रश्नासाठी त्या मुख्यमंत्र्यांच्या अंगावर धावून जायलाही पुढे-मागे पाहत नाही, असं विधान नाना पटोले यांनी केलं आहे.

'यशोमती ठाकूर रणरागिणी आहेत. विधानसभेत मी त्यांना अनेक वर्ष पाहिलंय. लोकांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या रणरागिणी आहेत. वेळ आली तर तुमच्यासाठी त्या मुख्यमंत्र्यांच्या अंगावर जायलाही पुढे मागे पाहत नाही,' असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

'आपला उमेदवार यापूर्वीपेक्षा अधिक मतांनी निवडून आला पाहिजे आणि ते काम आपल्याला करायचं आहे. मला महाराष्ट्रभर हा पॅटर्न लागू करायचा आहे. महिनाभरात हा पॅटर्न लागू करण्याचा विचार करतोय.



मला अपेक्षा आहे की तिवसा मतदारसंघाचा पॅटर्नच राज्यभर लागू होणार आणि त्यासाठी तुमचा सहभाग हवा,' असं आवाहन नाना पटोले यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे.

'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांना मानणारा मोठा वर्ग हा फक्त मोझरी परिसरातच नव्हे तर संपूर्ण देशभरात आहे. त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन आपण वाटचाल करू. महाराष्ट्रात २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून सत्तेत येईल आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेचा आधार घेऊनच ते सरकार काम करेल,' असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे.

## पृष्ठ १ वरुन

### ब्लॅकमेल करत महिला पोलीस

(पृष्ठ १ वरुन)

दिवसांपासून आरोपी आपल्या दोन मित्रांच्या मदतीने पीडितेला ब्लॅकमेल करत तिच्यावर लैंगिक अत्याचार करत होता. आरोपींच्या सततच्या त्रासाला कंटाळून पीडित महिला पोलीसानं मेघवाडी पोलिसांत गुन्हा नोंदवलाआहे. पोलिसांनी तक्रारीची शहानिशा केल्यानंतर तीन आरोपींविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पीडित महिला मुंबई पोलीस दलात सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) पदावर कार्यरत आहे. काही वर्षांपूर्वी तिची सोशल मीडियावर एका खाजगी बँकेत अधिकारी पदावर काम करणाऱ्या व्यक्तीची ओळख झाली होती. सोशल मीडियावरून ओळख झाल्यानंतर दोघांत मैत्री वाढत गेली. कालांतराने यांच्या मैत्रीचं रुपांतर प्रेमसंबंधात झालं. लैंगिक अत्याचाराचा व्हिडीओ केला शूट दरम्यान आरोपी प्रियकर एकेदिवशी पीडित महिलेला चकाला येथे भेटायला आला होता. याठिकणी आरोपीनं पीडित महिला पोलीस अधिकाऱ्याला शीतपेयातून गुंगीचं औषध दिलं आणि तिच्यावर बलात्कार केला. नराधम आरोपी एवढ्यावरचं थांबला नाही, तर त्याने लैंगिक अत्याचार करतानाचा व्हिडीओही शूट केला. हा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीनं अनेकदा पीडितेवर लैंगिक अत्याचार केला आहे.पुढारीनं दिलेल्या वृत्तानुसार, अलीकडेच पीडित महिलेचं एका तरुणाशी लग्न ठरलं होतं. याची माहिती आरोपीला मिळताच त्यानं पीडितेच्या होणाऱ्या नवऱ्याला याची माहिती देऊन तिची बदनामी करण्याचा प्रयत्न केला. आरोपी पीडितेला सतत ब्लॅकमेल करून अत्याचार करत होता. त्यामुळे पीडित महिला अधिकाऱ्यानं आरोपीच्या त्रासाला कंटाळून मेघवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तक्रार दाखल केल्यानंतर मेघवाडी पोलिसांनी पवई पोलिसांकडे हा गुन्हा वर्ग केला आहे. याप्रकरणी अद्याप कोणालाही अटक करण्यात आली नसून पोलीस घटनेचा तपास करत आहे.

### ठाण्यातील 20 'आपला

महापालिका खासगी संस्थेच्या माध्यमातून नागरिकांना विनामुल्य आरोग्य सुविधा देत आहे. शिवसेना आणि महापालिकेचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखला जातो. परंतु गेल्या सहा महिन्यांत महापालिकेकडून एक रुपयाचेही देयक अदा करण्यात आलेले नसल्यामुळे संबंधित संस्थेने शुक्रवारपासून दवाखाने बंद केले आहेत. त्यामुळे करोना काळात नागरिक आरोग्य सुविधेपासून वंचित राहण्याची भिती व्यक्त होत आहे.

ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २६ लाखांच्या घरात पोहोचली आहे. शहरात ५२ टक्के नागरिक झोपडी आणि चाळीमध्ये राहत आहेत. आरोग्य निकषांनुसार प्रत्येक ३० ते ४० हजार लोकसंख्येसाठी एक आरोग्य केंद्र असणे आवश्यक असताना शहरात केवळ २७ आरोग्य केंद्र आहेत. त्यामुळे एक ते दीड लाख लोकसंख्येचा भार एका आरोग्य केंद्रावर पडतो आहे. हा ताण कमी करण्यासाठी तसेच शहरातील नागरिकांना घराजवळच विनामुल्य आरोग्यसुविधा मिळावी, या उद्देशातून महापालिकेने शहरात ५० ठिकाणी आपला दवाखाना उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला होता. त्याचे कंत्राट 'मेडऑनगोस आपला दवाखाना' या संस्थेला देण्यात आले. या संस्थेला प्रत्येक रुग्णामागे दीडशे रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या संस्थेने 'वन रूपी क्लिनिक' संस्थेशी भागीदारी करून त्यांच्या माध्यमातून गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात शहरात २० ठिकाणी दवाखाने सुरु केले. या उपक्रमासाठी पाच वर्षांकरिता पालिकेने १६० कोटींचा खर्च अपेक्षित धरला आहे. या उपक्रमात गेल्या सहा महिन्यात ६९ हजार नागरिकांना विनामुल्य आरोग्य सुविधा देण्यात आली आहे. संबंधित संस्थेने शुक्रवारपासून अचानकपणे सर्वच दवाखाने बंद केले आहेत. या संदर्भात वन रूपी क्लिनिकचे संचालक डॉ. राहुल घुले यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या वृत्तास दुजोरा दिला. गेल्या सहा महिन्यांच्या कामाचे पैसे संबंधित संस्थेकडून मिळालेले नाही. तरीही आम्ही सहा महिने दवाखाने चालविले. आता पैशांअभावी हा उपक्रम सुरु ठेवणे शक्य नसल्यामुळे दवाखाने बंद केल्याचे त्यांनी सांगितले.

ठाणे शहरात वन रुपी क्लिनिक संस्थेच्या माध्यमातून आम्ही गेल्या सहा महिन्यांपासून आपला दवाखाना उपक्रम राबवित आहोत. या उपक्रमासाठी महापालिकेकडून निश्चित करण्यात आलेले पैस अद्याप मिळालेले नाहीत. कोणतीही कंपनी पैशाविना काम करू शकत नाही. या उपक्रमातील डॉक्टर, आरोग्य सेवक आणि दवाखान्यांच्या जागेचे भाडे हा खर्च करणे शक्य होत नसल्यामुळे संबंधित संस्थेने तात्पुरते दवाखाने बंद केले आहेत. कायमस्वरुपी हे दवाखाने बंद केलेले नसून आम्ही देयक मिळण्याची वाट पाहत आहोत.ॲड. जसीम शेख, कायदेविषयक राज्य प्रमुख, मेडऑनगोस आपला दवाखाना संस्था

आपला दवाखाना या उपक्रमाचे देयक नेमके कशामुळे थकले, हे तपासून संबंधित संस्थेला कामाचे देयक अदा करण्यात येईल. या उपक्रमातील दवाखाने पुर्वीप्रमाणे सुरु करण्यात येतील.

### किल्लय़ांचे टप्प्याटप्प्याने

संवर्धनाचे नियोजन करण्यात यावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. किल्ल्यांच्या परिसरातील जैवविविधता, निसर्ग, प्राणी-पक्षी यांची देखील जपणूक तितकीच महत्त्वाची असून त्याविषयीही पर्यटक आणि संशोधक यांना आकर्षक स्वरूपात उपयुक्त माहिती मिळणे गरजेचे आहे, असेही मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले. दुर्गप्रेमींच्या सूचना 'दुर्गसंवर्धन खाते सुरू करावे, दुर्गासाठी साहाय्यता निधी सुरूकरावा. 'गड-किल्ल्यांचे अधिग्रहण राज्य सरकारने करावे.'पर्यटन विभाग, पुरातत्त्व विभाग आणि वन विभाग यांच्यात उत्तम समन्वय आवश्यक. दुर्गसंवर्धनात आपण आजपर्यंत केवळ अडीअडचणींचा पाढा वाचत होतो, आता तसे होणार नाही. अडचणींतून मार्ग काढून पुढे कसे जायचे ते तज्ज्ञांनी एकत्र बसून ठरवावे. किल्लय़ांच्या संवर्धनाचा र्सवकष आराखडा तयार करावा, राज्य शासन संपूर्ण सहकार्य करेल. – उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

### शेतकरी पुन्हा रस्त्यावर उतरणार, दूध

तयारीकडेही अक्षम्य दुर्लक्ष चालवले आहे, परिणामी शेतकऱ्यांना आत्तापासूनच खतांची तीव्र टंचाई भासू लागली आहे. अनेक ठिकाणी खतांच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. केंद्र सरकारने डिझेल, पेट्रोल आणि गॅसचे दर भयानक प्रमाणात वाढवले आहेत. भरमसाठ विजबिले भरणे अशक्य होत चालले आहे. केंद्र व राज्य सरकारचे या प्रश्नांकडे लक्ष वेधून ते धसास लावण्यासाठी १७ जून रोजी राज्यभरातील तहसिलदार कार्यालयांवर मोर्चे काढत निदर्शने करण्याचा निर्णय किसान सभेच्या राज्य काउन्सिलच्या बैठकीत घेण्यात आला आहे,' असेही नवले यांनी सांगितले.

राज्यभरातील तहसील कार्यालयांवर कोविडची नियमावली पाळत करण्यात येत असणाऱ्या या आंदोलनात शेतकऱ्यांनी हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, किसन गुजर, अर्जुन आडे, उमेश देशमुख, डॉ. अजित नवले यांनी केले आहे.

### पुणे: 'ती' बेपत्ता मुलगी

मुलगी बेपत्ता झाल्याने एकच खळबळ उडाली होती. या मुलीच्या पालकांनी या बाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यावरून अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी सोशल मीडियावर मेसेज पाठवून, मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली होती.

### बनावट पत्रकारांवर

आणि प्रेसच्या नावाखाली ब्लॅकमेल करण्याचा व्यवसाय काही पैसे घेऊन संपूर्ण देशात सुरू आहे. जे नियंत्रित करणे आवश्यक आहे. या संदर्भात, सर्व राज्यांची माहिती मंत्रालययासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत कर्नल राजवर्धनसिंग राठोड यांनी पुढे सांगितले की, भारत सरकारच्या आरएनआय द्वारे नोंदणीकृत किंवा टीव्ही / रेडिओ माहिती प्रसारण मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेले वृत्तपत्र / मासिक पत्रकार / वार्ताहर नियुक्त करू शकेल आणि फक्त त्याचे संपादकच प्रेस कार्ड जारी करु शकतात. करू शकता. जेव्हा पत्रकारांनी न्यूज पोर्टलविषयी विचारले तेव्हा राठोड यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की माहिती व प्रसारण मंत्रालयात इंटरनेटवर चालू असलेल्या न्यूज पोर्टलच्या नोंदणीची कोणतीही तरतूद नाही आणि केबल (डिश) टीव्हीवर कोणतेही न्यूज पोर्टल व न्यूज चॅनेल चालू नाहीत. कोणत्याही प्रकारच्या पत्रकाराची नेमणूक करू शकत नाही किंवा प्रेस आयडी जारी करू शकत नाही, जर कोणी असे केले तर ते बेकायदेशीर आहे आणि त्याच्यावर कारवाई होणार आहे.

### प्रभूरामाच्या नावे घोटाळा होत

केली आहे. तर दुसरीकडे, चंपत राय यांनी आरोपांचे स्पष्टीकरण देताना म्हटलं आहे की, 'आमच्यावर महात्मा गांधी यांच्या हत्येचा आरोपही करण्यात आला होता. त्यामुळे अशा प्रकारच्या आरोपांना घाबरत नाही आणि याची चौकशी करून घेऊ.'

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार १५ ते २१ जून २०२१

## संपादकीय...



### सेंट्रल व्हिस्टा'वर राजकारणाचे शिंतोडे कशाला?

विजय दर्डा ,चेअरमन, एडिटोरियल बोर्ड, लोकमत समूहपंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रत्येक गोष्टीवर चुकीचे सिद्ध करण्याचा प्रयत्न जर आपण करत राहिलो तर विरोधकांचे अस्तित्व कमकुवत होईल. विरोधासाठी विरोध करण्यापेक्षा रचनात्मक विरोध केला तर विरोधकांचा आवाज अस्तित्वात राहील. सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाबाबत आज काही जण विरोध करीत आहेत; परंतु त्यांना हे माहीत हवे की नवीन संसद भवन बांधण्यासाठी २०१२मध्ये काँग्रेस शासनकाळात तत्कालीन लोकसभा अध्यक्ष मीरा कुमार यांनी सर्वप्रथम पुढाकार घेतला होता.



अटलबिहारी वाजपेयींसहित इतर पक्षांनीही त्याला समर्थन दिले होते.उपराष्ट्रपती, पंतप्रधानांच्या कार्यालया-बरोबरच त्यांचे निवासस्थान व सर्व ५१ मंत्रालये या प्रकल्पात एकत्र असतील. तिथेच खासदारांची कार्यालये असतील, सर्व इमारती आतून एक दुसऱ्याशी जोडलेल्या असतील. सुरक्षेच्या दृष्टीनेही त्याचा फायदा होईल आणि सामान्यांना होणारा त्रास कमी होईल. कारण 'व्हीआयपी मूव्हमेन्ट'च्या वेळी सामान्य लोकांना खूप त्रास होतो. सुमारे २० हजार कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प आहे. २०२४मध्ये आपल्या दुसऱ्या कार्यकाळाच्या समाप्तीआधीच या प्रकल्पाचे बहुतांश काम पूर्ण करण्याचा मोदी यांचा मानस आहे. राहिलेले किरकोळ काम नंतर करता येईल.सध्या या खर्चावरून वादंग माजला आहे. इतके दिवस सगळे नीट चालले होते, तर महामारीच्या काळात इतके पैसे खर्च करायची गरज काय?- असा प्रश्न विचारला जात आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट, फायदे याबद्दलही प्रश्न केले जात आहेत. वरवर पाहता हे प्रश्न योग्य वाटू शकतील; पण जरा खोलात जाऊन गोष्टी समजून घेतल्या तर लक्षात येईल की, प्रशासकीय दृष्टिकोनातून भविष्यकाळ लक्षात घेऊन हा प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक आहे. मी अठरा वर्षे संसदेचा सदस्य होतो. तिथल्या गरजा मी जवळून पाहिल्या आणि समजून घेतल्या आहेत. इथल्या अनेक इमारती जीर्ण झाल्या आहेत. तिथे बसून काम करणे मुश्कील आहे. भारताचे कायदेमंडळ संसदभवनात बसते. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि ५१ मंत्रालयांची कार्यालये वेगवेगळ्या जागी बसतात. राष्ट्रपती भवन, संसद भवन, नॉर्थ तसेच साउथ ब्लॉक, राष्ट्रीय संग्रहालय भवन या सर्व वास्तू १९३१मध्ये बांधल्या गेल्या. त्यानंतर गरजेनुसार १९५६ ते ६८ या काळात निर्माण भवन, शास्त्री भवन, उद्योग भवन, रेल भवन आणि कृषी भवन बांधले गेले. आज ३९ मंत्रालये सेंट्रल व्हिस्टा क्षेत्रातील विभिन्न भवनात चालतात, तर १२ मंत्रालये त्याच्या बाहेर भाड्याच्या जागेत आपली कार्यालये थाटून आहेत. त्यासाठीचे भाडे वर्षाला एक हजार कोटी रुपये आहे हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल.पंतप्रधानांचे कार्यालय आणि इतर मंत्रालयांपासून या भाड्याच्या जागेत चालणाऱ्या मंत्रालयांच्या इमारतींमधले अंतरही पुष्कळच आहे. अर्थातच यामुळे प्रशासनिक कामकाजात अडचणी येतात. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे सरकारने भाड्यापोटी हे इतके पैसे खर्च करणे उचित आहे काय? जरा हिशेब करा, भाड्यापोटी सरकारने आतापर्यंत किती रक्कम खर्च केली असेल! मी जितका काळ संसदेत होतो, तेवढ्या काळातच वीस हजार कोटी रुपये भाड्यापोटी दिले गेले असतील.सेंट्रल व्हिस्टा आणि त्याच्या बाहेरच्या ठिकाणी जेव्हा इमारती उभ्या राहिल्या, तेव्हा आजच्यासारखा डिजिटलचा जमाना नव्हता हे महत्त्वाचे आहे. आता संसद भवन आणि मंत्रालयाच्या सुरक्षेबरोबरच डिजिटल फायलींच्या सुरक्षेचाही मोठा प्रश्न कायम असतो. नवे संकुल झाल्यानंतर या दोन्ही गोष्टींच्या सुरक्षेची निश्चिती होईल.भारत आज जगातील उगवती शक्ती आहे. त्यामुळे देशाचे प्राधान्यक्रम बदलणे स्वाभाविक आहे. त्यासाठी केंद्र सरकार आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज भवनांच्या एका संकुलात असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे मंत्रिगण सहजपणे एका मंत्रालयातून दुसरीकडे जाऊ शकतील. परस्परांना सहजतेने भेटू शकतील. बोलू शकतील. सेंट्रल व्हिस्टा प्रोजेक्टमध्ये बांधल्या जात असलेल्या इमारतीत ५१ मंत्रालये एकमेकांच्या जवळ राहतील. प्रशासकीय दृष्टीने ते निश्चितच लाभदायक ठरेल.आपली लोकसंख्या वाढते आहे त्याप्रमाणात भविष्यात संसद सदस्यांची संख्याही वाढेल हे आपल्याला लक्षात घ्यावे लागेल. त्या अनुषंगानेच संसद भवनाची नवी इमारत ६५,४०० चौरस मीटर इतक्या जागेची असेल.

# 'सी'बाधाग्रस्तांचे सदेह पर्यटन!

ग. दि. माडगूळकर यांचे 'कलावंताचे आनंद पर्यटन' हे पुस्तक एक अप्रतिम आनंद-वाचन ठरते. इंग्लंडमधील रमणीय आणि तुलनेने दुर्लक्षित अशा कॉर्नवॉल येथे यथासांग पार पडलेल्या 'जी ७' राष्ट्रगटाच्या बैठकीचे वर्णन याआधारे श्रीमंत देशप्रमुखांचा पर्यटन उत्सव असे करता येईल. पण तो आनंददायक खचितच नाही. अलीकडच्या लघुरूपीय शैलीचा आधार घेत सांगावयाचे तर या 'जी ७' परिषदेवर तीन 'सीं'चे गडद सावट होते. करोना, क्लायमेट (हवामान/ पर्यावरण) आणि चीन. या तीन मुद्दय़ांवर या बैठकीत काय झाले याचा परामर्श घेण्याआधी तिचे महत्त्व लक्षात घ्यायला हवे. विशेषत: करोनाकाळातील शरीर-मन आंबवून टाकणाऱ्या वर्षभराच्या वैद्यकीय नजरकैदेनंतर जगातील सात देशांचे प्रमुख एकमेकांस सदेह भेटतात, हीच बाब मुळात अप्रूप. सर्व काही दूरसंवादाच्या माध्यमातून करावयाच्या आजच्या काळात हे सात नेते जवळ, संवादासाठी एकत्र येऊ शकले हे त्या-त्या देशातील उत्तम करोना हाताळणीचे निदर्शक. इंग्लंडमधील त्या देशाच्या मानाने गरीब म्हणावे अशा रम्य सागरी कॉर्नवॉल परिसरात अमेरिका, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स, इटली, जपान आणि यजमान इंग्लंड या देशांच्या प्रमुखांची ही बैठक पार पडली.

'जी ७' ही संकल्पना कालबाह्य़ आणि म्हणून मृत झाली आहे, असे अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केले होते. विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांनी तिचे विधिवत पुनरुज्जीवन केले. या परिषदेस निघण्याआधी त्यांनी 'गरजू' देशांना कोणत्याही अटींशिवाय करोना प्रतिबंधक लशींचा पुरवठा करण्याचा निर्णय जाहीर केला. काही कोटी इतक्या लशी याअंतर्गत दान करण्यात येणार असून त्यात भारताचाही समावेश आहे. ही शुभ दानवार्ता भारतास अध्यक्ष बायडेन यांनी नव्हे, तर उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी जातीने कळवली आणि आपण त्याबद्दल अमेरिकेचे जाहीर ऋण व्यक्त केले. पन्नास वर्षांपूर्वी अमेरिकेतर्फे भारतास आपत्कालीन मदत म्हणून निकृष्ट अन्नधान्य पुरवठा केला गेला. आता आपत्कालीन मदत लशींची आहे. फरक इतकाच की, त्या निकृष्ट नाहीत. भारतीय बनावटीच्या 'कोव्हॅक्सिन'ला अमेरिकेत सरसकट लस म्हणून तूर्त मान्यता न देण्याचा निर्णय त्या देशाने घेतलेला असताना, त्या देशाच्या लशी मात्र आपणास मुकाट शिरोधार्य मानून टोचून घ्याव्या लागतील. या परिषदेआधीच अमेरिकेने हा लसदानाचा कार्यक्रम जाहीर करून 'जी ७' बैठकीत करोना हा मुद्दा कार्यक्रम पत्रिकेवर राहील, याची व्यवस्था केली.

त्याप्रमाणे या बैठकीत जगभरात 'जी ७' देशांच्या वतीने आगामी काळात किमान ५० कोटी इतका प्रचंड लससाठा उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला. त्याचे स्वागत करताना, या सर्व देशांनी आपापल्या नागरिकांसाठी लशींची पुरेशी बेगमी केल्यानंतरच 'आधी पोटोबा मग..' या उक्तीप्रमाणे हा दानयज्ञ सुरू केला, ही बाब लक्षात घ्यावी अशी. ज्या इंग्लंड देशात ही परिषद भरली, त्या देशात तर हे लसीकरणाचे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक आहे आणि अमेरिकेनेही ८५ टक्क्यांहून अधिक नागरिकांस लस टोचलेली आहे.

लशीच्या दोन्ही मात्रा मिळालेल्यांचे प्रमाण या दोन्ही देशांत ५० टक्क्यांहून अधिक आहे. हे वाचून लगेच 'त्यांची लोकसंख्या किती, आपली किती' आदी नेहमीची प्रतिक्रिया उमटेलच. ती लक्षात घेतल्यास, आपल्यासारख्या प्रचंड लोकसंख्याधारी देशाने लसीकरणाचे नियोजन किती आधीपासून करायला हवे होते, हीच बाब अधोरेखित होते.

त्यामुळे बडय़ा देशांच्या लसदानयज्ञाची वाट पाहण्याची वेळ आपणावर आली नसती. इतिहासापासून काहीच न शिकण्याची आपली परंपरा पुढेही जोमाने सुरू आहे हे यातील दु:ख.

क्लायमेट- हवामान हा या 'जी ७' परिषदेसमोरील दुसरा 'सी'. या मुद्दय़ावर हरितगृह वायू उत्सर्जनावर कालबद्ध नियंत्रण सुचवणाऱ्या पॅरिस करारातून माजी अध्यक्ष ट्रम्प यांनी माघार घेतली होती. बायडेन यांनी त्यात पुन्हा सहभागी होण्याचा निर्धार आधीच जाहीर केलेला आहे. तोही स्वागतार्ह. वास्तविक या मुद्दय़ावर विकसनशील देशांनी एकत्र येऊन विकसित देशांस आव्हान नाही तरी त्यांची कानउघडणी करणे आवश्यक आहे. याचे कारण विकसित देशांची ऊर्जेची गरज भागलेली आहे आणि




ती भागवताना पर्यावरणाचे जे काही नुकसान करायचे ते त्यांनी करून झालेले आहे. तेव्हा कर्बवायू उत्सर्जनावर नियंत्रणच आणायचे असेल तर त्याचा मोठा वाटा या बडय़ा देशांनी आपल्या शिरावर घ्यायला हवा. अमेरिकेचे माजी अध्यक्ष ट्रम्प यांच्याच पक्षाचे जॉर्ज बुश यांनी त्या वेळी वसुंधरेच्या वाढत्या तापमानासाठी भारताच्या नऊ टक्के या विकासदरास बोल लावले होते. तेव्हाच्या अर्थव्यवस्थेच्या आकारमानाच्या तुलनेत भव्य असा नऊ टक्के विकासदर हा सद्य:परिस्थितीत ९० टक्केसदृश असला तरी, भारतास बोल लावणे बेजबाबदारपणाचे होते. खाऊन खाऊन तुंदिलतनु झालेल्याने कष्टाने चार पैसे मिळवून बरे दिवस अनुभवणाऱ्यास 'जरा जपून खा' असा सल्ला देण्यासारखे. तेव्हा विकसित देशांनी आपल्या विकासात आधी विकसनशीलांना सामावून घेतल्याखेरीज हा पर्यावरणीय गुंता सुटणारा नाही.

बायडेन यांचा प्रस्तावित पायाभूत प्रकल्प नेमकी त्याचीच हमी देतो. तिसऱ्या जगातील देशांत पायाभूत सोयीसुविधा उभारण्यासाठी बायडेन यांनी 'जी ७' गटाने पुढाकार घ्यावा असे या परिषदेत प्रस्तावित केले. हा तिसऱ्या 'सी'च्या.. म्हणजे चीन..

आव्हानास सामोरे जाण्याचा एक मार्ग. चीनने आपल्या प्रचंड महामार्ग आदी प्रकल्पांआधारे आधी आशियाई आणि पुढे युरोपीय देशांत मुसंडी मारण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. गरजूंना मदत करण्याच्या मिषाने आपले हित साधणे हा खरा यामागील उद्देश. अमेरिका त्याच मार्गाने त्यास उत्तर देऊ पाहाते. त्यासाठी 'जी ७' हे उत्तम व्यासपीठ असेल. बायडेन यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार विकसनशील देशांत पायाभूत सोयीसुविधा निर्मितीसाठी ४० लाख कोटी डॉलर्स (४० ट्रिलियन डॉलर्स) वा अधिक रकमेची गरज आहे. म्हणजे इतक्या खर्चानंतर हे देश विकसित म्हणवून घेण्यास पात्र ठरतील. इतक्या रकमेची गरज म्हणजे इतकी महाप्रचंड व्यवसाय संधी. परमार्थ साध्य करता करता या राजमार्गाने स्वार्थ साधावा असा हा विचार. म्हणजे स्वार्थ चीनचा की अमेरिकाकेंद्रित 'जी ७' देशसमूहाचा- हाच काय तो गरीब देशांना पर्याय. अर्थात, असे असेल तर पोलादी पडद्यामागच्या कारस्थानी चीनपेक्षा पारदर्शी अमेरिका हा पर्याय केव्हाही अधिक स्वीकारार्ह.

यामागील अनेक कारणांतील अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे अर्थातच लोकशाही. या 'जी ७' देशसमूहाचे वैशिष्टय़ असे की, हे सर्व देश जातिवंत आणि प्रामाणिक लोकशाहीवादी आहेत. बायडेन यांनी या व्यासपीठावरून जागतिक पातळीवर याच लोकशाहीचा रास्त पुरस्कार केला ही बाब सूचक आणि महत्त्वाची. अनेक देशांनी या 'जी ७' समूही देशांप्रमाणे प्रामाणिक लोकशाही तत्त्वे अंगीकारावी हा त्यांचा प्रयत्न स्तुत्यच.

विशेषत: मतपेटीद्वारे हुकूमशाहीचा नवा प्रयोग जगात लोकप्रिय होत असताना बायडेन आणि 'जी ७'ची ही मनीषा कौतुकास्पद. त्याची कसोटी बायडेन या आठवडय़ात या मताधारित हुकूमशाहीचे प्रणेते रशियाचे व्लादिमीर पुतिन यांना जिनिव्हा येथे भेटतील तेव्हा लागेल. अमेरिकेसाठी कडव्या वैरत्वापर्यंत पोहोचलेल्या पुतिन यांना ते कसे हाताळतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरावे. तूर्त करोनाचे सावट दूर करून हे सर्व देशप्रमुख तरी पूर्वीप्रमाणे हिंडूफिरू लागले ही बाबच कौतुकास्पद. म्हणूनच हे 'सी'बाधाग्रस्त पर्यटन – तेही सदेह – दखलपात्र ठरते.

# पावसाचा हाहाकार! मुंबई-गोवा महामार्गावर कोसळली दरड, वाहतूक ठप्प

सिंधुदुर्ग : मुंबई-गोवा महामार्गावर खारेपाटणजवळ नडगिवे घाटात रात्री दरड कोसळली. जेसीबीच्या साहाय्याने माती दगड बाजूला केले. मात्र, चिखल असल्याने वाहतूक एकेरी सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.



सिंधुदूर्ग जिल्ह्याला रात्रभर पावसाने झोडपून काढलं आहे. यामुळे सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचलेलं आहे.

सततच्या पडणाऱ्या पावसामुळे मध्यरात्रीच्या सुमारास मुंबई-गोवा हायवे, नडगिवे गावाजवळ घाटामध्ये दरड कोसळली. दरड कोसळून पूर्णतः रस्त्यावर आल्याने महामार्ग ठप्प झाला होता. दरड कोसळल्याची माहिती मिळताच कणकवली पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक सागर खंडागळे याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. यानंतर तत्काळ वीज मंडळ अधिकारी तसेच वैभववाडी, हायवे रोड ठेकेदार के सी सी कंपनीचा स्टाफ यांनी जेसीबीच्या साहाय्याने माती दगड बाजूला काढून रस्ता मोकळा करण्याचे काम युद्ध पातळीवर केलं. दरड कोसळल्यानंतर पावसाची संततधार सतत सुरू आहे. त्यामुळे चिखल झाला असून यामुळे रस्ते वाहतूक एक मार्गी सुरू केली आहे. तर अद्यापही दरड बाजुला करण्याचं काम सुरु असून सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, आज मुंबई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापुर, सातारा व घाटमाथ्यासह संपूर्ण महाराष्ट्र ऑरेंज जारी करण्यात आला. इतकंच नाहीतर आज मुंबईत अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने वर्तवला आहे. हवामानाच्या अंदाजानुसार आज रायगड आणि रत्नागिरीला मात्र रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, आज कोकणातील सिंधुदुर्ग, रायगड, महाबळेश्वर आणि रत्नागिरीसह इतर भागातही मुसळधार पावसाचा अंदाज आहे. अरबी समुद्राच्या पूर्व-मध्य आणि उत्तरेकडील बाजूने आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या क्षेत्र तयार झाल्यामुळे मुंबईत मुसळधार पाऊस सुरू आहे.

# आरक्षणविरोधी गुणरत्न सदावर्तेंचा सत्कार; मराठा आंदोलकांची सिटी प्राइड हॉटेलवर धडक



नांदेड: मराठा आरक्षणाच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करणारे ॲड. गुणरत्न सदावर्ते यांचा सत्कार केल्याप्रकरणी मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी बुधवारी नांदेडमधील

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात सध्या वातावरण तापलं आहे. खासदार संभाजीराजे भोसले यांनी या मुद्द्यावर मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. विरोधी पक्षानंही आक्रमक भूमिका घेतली आहे. हे सगळं सुरू असतानाच काही दिवसांपूर्वी सदावर्ते यांचा सत्कार करण्यात आला. सदावर्ते यांनी मराठा आरक्षणाविरोधात याचिका केली होती. तसंच, माध्यमांमधून ते सतत मराठा आरक्षणाच्या विरोधात भूमिका मांडत आहेत. सर्वोच्च न्यायालयानं मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्यानं काही लोकांनी सदावर्ते यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. मूळचे नांदेडचे असलेल्या सदावर्ते यांचा सत्कार समारंभ येथील सिटी प्राइड हॉटेलात आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात सिटी प्राइड हॉटेलचे मालक व्यंकट चारी यांनी सदावर्ते यांना पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला. या सत्काराचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यामुळं संतापलेल्या मराठा संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सिटी प्राईड हॉटेलसमोर धरणे आंदोलन करत हॉटेल मालकाला धारेवर धरले. हॉटेल मालक व्यंकट चारी यांनी आंदोलकांची जाहीर माफी मागितली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून हॉटेल बाहेर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# वैनगंगा नदीत ट्रक कोसळला, दोघांचा जागीच मृत्यू एकजण जखमी



गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यातील आष्टी येथून वाहणाऱ्या वैनगंगा नदीत तेंदूपत्ता बोद घेऊन चंद्रपूरकडे जाणारा ट्रक क्रमांक एम एच 34 बी जी-6111 मध्यरात्री 2:30 दरम्यान पूल ओलांडताना चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक नदीत कोसळला. ट्रकमध्ये वाहन चालक, वाहक आणि क्लीनर असे तिघेजण होते. त्यापैकी दोघांचा जागीच मृत्यू झाला असून एकजण किरकोळ जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मृतकांमध्ये कालु उर्फ कमलेश सतविंदर सलूजा (25), नितीन दीपक बिके (32) आणि अजय अनिल कारपेनवार असे जखमी इसमाचे नाव असून आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहे. मागील 20 ते 25 दिवसापासून गडचिरोली जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलनाचे काम सुरू होते. सध्या काम पूर्ण झाले असून संबंधित कंत्राटदार तेंदूपत्ताचे वाहतूक करून आपल्या सोयीनुसार चंद्रपूर जिल्ह्यात असलेल्या मुख्य गोदामात आपला तेंदूपत्ता घेऊन चालले आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील तेंदूपत्ता कंत्राटदारांचे मुख्य गोडाऊन हे प्रामुख्याने राजुरा, बल्लारपूर आणि चंद्रपूर येथेच आहेत. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलन झाल्यावर सर्वच कंत्राटदार हे चंद्रपूर जिल्ह्यातील गोडाऊनमध्ये तेंदूपत्ताचे बोद जमा करतात. त्या अनुषंगाने सदर ट्रकसुद्धा चंद्रपूर जिल्ह्यात तेंदूपत्ता घेऊन चालला होता.

काल सायंकाळी सिरोंचा तालुक्यातून निघालेला ट्रक आष्टी मार्गे चंद्रपूरकडे जाताना मध्यरात्री जवळपास 2.30 वाजताच्या दरम्यान आष्टी येथील वैनगंगा नदीत कोसळला. यात दोघेजण जागीच ठार झाले असून एकजण किरकोळ जखमी असल्याची माहिती आष्टीचे पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांनी मटाशी बोलताना दिली. किरकोळ जखमी असलेला व्यक्ती कसेबसे बाहेर पडून पहाटेपर्यंत पुलावर प्रतीक्षा करत होता. पहाटेच्या दरम्यान आष्टीचे पोलीस निरीक्षक कुमार सिंग राठोड यांना माहिती मिळताच घटनास्थळी जाऊन चौकशी केली असता संबंधित व्यक्ती किरकोळ जखमी अवस्थेत आढळला. त्याला आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक कुमार सिंग राठोड यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक वैशाली कांबळे आणि चमू करीत आहेत.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार १५ ते २१ जून २०२१


## केंजळगडावर ट्रेकिंग करताना 10 वर्षांचा मुलगा थेट 200 फूट खोल दरीत कोसळला!



सातारा : वाई तालुक्याच्या पश्चिम भागातील केंजळगड पाहण्यासाठी गेलेल्या पर्यटकांपैकी १० वर्षीय मुलगा खोल दरीत कोसळल्याची घटना घडली आहे. मयंक गणेश उरणे (रा. सासवड, ता. पुरंदर) असं पाय घसरून खोल दरीत पडलेल्या मुलाचं नाव असून तो गंभीर जखमी झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्याला दरीतून बाहेर काढण्यात आलं. वाई येथे प्राथमिक उपचार झाल्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी पुणे येथे पाठवण्यात आलं आहे.

केंजळगडावर पर्वतारोहण करण्यासाठी सासवड, ता. पुरंदर परिसरातील रहिवासी असलेले सात ते आठ पर्यटक आले होते. यामध्ये मयांक उरणे हा आपल्या वडिलांसोबत आला होता. केजळगडावर आज सकाळी ७ वाजता पर्वतारोहणासाठी सुरुवात केली. सकाळी ८.३० ते ९ च्या दरम्यान पुढे जात असताना या चमूतील मयंक उरणे (वय १०) हा दोनशे फूट खोल दरीत कोसळून गंभीर जखमी झाला. थंड हवा, पावसाची रिप रिप, वाढलेले गवत यामुळे किल्ल्याच्या पाऊलवाटेवर दलदल झाली आहे. यामुळे मयंकचा पाय घसरून तो दोनशे फूट दरीत कोसळून खोल दरीत झाडाला धडकून झुडपात अडकला होता.

**कसा लागला शोध?**

मयांकचा शोध घेऊनही तो सापडत नसल्याने आसरे ते रायरेश्वदर रस्त्यावर असणाऱ्या पाखिरे वस्तीवर संबंधित पर्यटकांनी येऊन माहिती दिली. तेथील गंगाराम सपकाळ, सागर पाकीरे, सुरेश पाकीरे, रामदास पाकीरे, सचिन पाकीरे, नवनाथ पाकीरे, विलास पाकीरे, विजय पाकीरे असे सर्वजण ग्रामस्थांना सोबत घेऊन मयंक उरणे याचा शोध घेण्यास गेले असता त्यांनी खोल दरीतून त्याला गंभीर जखमी अवस्थेत शोधून बाहेर काढलं.

जखमी मयांकला वाई येथील रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी पुणे येथे दाखल केलं आहे. ही माहिती मिळताच पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक संजय मोतेकर पोलिस नाईक यांनी आपले सहकारी शिवाजी वायदंडे, सुभाष धुळे, प्रशांत शिंदे, अमित गोळे, संजय देशमुख व संतोष शेलार आदींनी घटनास्थळी धाव घेतली. पाखिरे वस्तीतील युवकांनी मुलाचा शोध घेऊन बाहेर काढल्याबद्दल व मदतकार्य केल्याबद्दल वाई तालुक्यातील नागरिकांनी या वस्तीतील ग्रामस्थांचे आभार मानले.

## मुख्यमंत्र्यांच्या दिल्ली दौऱ्याबाबत विनायक मेटेंनी केला घणाघाती आरोप



अहमदनगर : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. मात्र या भेटीबाबत शिवसंग्राम पक्षाचे नेते

विनायक मेटे यांनी वेगळाच आरोप केला आहे. 'महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि त्यांचे सहकारी मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटले. त्यांनी खरंतर मराठा आरक्षणाचा कांगावा करत अन्य सतरा प्रश्नही यावेळी पुढे रेटले आहेत,' असं विनायक मेटे यांनी म्हटलं आहे.

सत्ताधाऱ्यांच्या या दिल्लीभेटीचे मराठा आरक्षणाच्या दृष्टीने फलित काय झाले, हे जाहीर करावे, अशी मागणीही मेटे यांनी केली आहे.

विनायक मेटे शनिवारी नगरला आले होते. त्यावेळी पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. मेटे म्हणाले की, 'सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाविरोधात निकाल दिल्याने समाज सैरभैर झालेला आहे. त्यामुळे आम्ही वेगवेगळे विषय हाती घेतलेले आहेत. येत्या आठ दिवसांमध्ये निवृत्त न्यायाधीशांची समिती स्थापन करून पुढे कशा पद्धतीने संघर्ष करायचा, याचा निर्णय घेणार आहोत.

त्यासोबतच राज्य सरकारच्या हातात असलेल्या सवलती मिळाव्यात यासाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. प्रत्येक जिल्ह्यात आता मोर्चे काढणार आहोत. राज्याचे मुख्यमंत्री तसेच मंत्री दिल्लीला जाऊन आले. वास्तविक पाहता यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी जातो, असे सांगितले. मात्र ते अन्य सतरा विषय घेऊन गेले. एक प्रकारे मराठा समाजाच्या आरक्षणाचा कांगावा करीत अन्य विषय त्यांनी रेटले आहेत. तुम्ही दिल्लीत गेला मग काय झाले, हे जनतेला जाहीरपणे सांगा.' असं आव्हान त्यांनी दिले.

ते पुढे म्हणाले, 'आगामी काळात कायदेशीर लढाई, समाजमध्ये जागृती, विधिमंडळात संघर्ष अशी भूमिका आमच्या पक्षाने घेतली आहे. येत्या काळामध्ये जर सरकारने ठोस भूमिका जाहीर केली नाही, तर पावसाळी अधिवेशन आम्ही चालू देणार नाही. जे मराठा नेते आमदार प्रत्येक पक्षांमध्ये आहेत, त्यांनी गांभीर्याने घ्यावे. पाच जुलैपर्यंत निर्णय घेतला नाही, तर अधिवेशन चालू देऊ नका. तुम्ही समाजाबरोबर नुसतेच बाहेर नाही तर सभागृहामध्येही एकच राहा, आंदोलन करा,' असंही मेटे म्हणाले.

'देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी अनेकांचे योगदान होते, तसंच आज मराठा समाजातील विद्यार्थ्यांचा व समाजाचा प्रश्न हा स्वातंत्र्याच्या सारखाच ऐरणीवर आलेला आहे. त्यामुळे त्याचे नेतृत्व एकानेच काय अनेकांनी करावे. त्यामुळे आमच्यामध्ये कोणतीही मतभिन्नता नाही. त्यातून समाजाचे नुकसानही होत नाही. जो तो आपापल्या मार्गाने आंदोलन करत आहे. आमचे ध्येय समाजाला आरक्षण मिळावे एवढेच आहे,' असं म्हणत विनायक मेटे यांनी संभाजीराजेंच्या भूमिकेविषयी आपली प्रतिक्रिया दिली आहे.


## वेश्या व्यवसायावर कारवाई करून 02 पिडित मुलींची केली सुटका

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध भायंदर कक्ष यांची कामगीरी.



महिला नामे अनिशा चौहान व मंजु मेहता ह्या पुरुष गि-हाईकांकडून वेश्यागमनाच्या मोबदल्यात पैसे स्विकारुन शिवारगार्डन, सरदार वल्लभभाई पटेल स्कुल जवळ, मिरारोड पूर्व या ठिकाणी वेश्यागमनाकरीता पुरुष गि-हाईकांना मुली पुरविणार असल्याची खाञजीशिर बातमी मिळाल्याने, दि. ०७.०६.२०२१ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईदर यांनी पथकासह नमुद ठिकाणी बोगस गि-हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन १३.५० वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल अनिशा राजु चौहान, वय ३० वर्षे ही वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्वीकारुन त्या मोबदल्यात मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने तिचेकडून वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रोख रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ प्रौढ मुलींची सुटका करण्यात आली. सदर बाबत महिला वेश्यादलाल व तिची साथीदार मंजु मेहता यांच्या विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे पो.हवा./१९८७ विजय ढेमरे यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. 1 २१९/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई डा. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./१९८७ विजय ढेमरे, पो.शि./३६६० केशव शिंदे, म.पो.ना./२८४५ कमल चव्हाण, चालक पोना/२६३८ गावडे यांनी केली आहे.

## साखर झोपेतच कुटुंबावर कोसळली शाळेची भिंत, ९ जण ढिगाऱ्याखाली अडकले



अमरावती : अमरावती जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली. अशातच पावसाळ्यातील अपघात टाळण्यासाठी जिल्हाप्रशासनाने मार्गदर्शन जाहीर केले. मात्र मोर्शी तालुकयातील उदखेड इथं जिल्हा परिषद शाळेची भिंत कोसळून साखर झोपेत असलेले एकाच कुटुंबामधील ९ जण दबल्याने जखमी झाल्याची धक्कादायक घटना रविवारी १३ जूनला घडली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेवून दबलेल्यांना बाहेर काढल्याने जीवितहानी टळली.

उदखेड येथील जिल्हा परिषद शाळेला लागूनच कुरवाडे कुटूंबीय राहातात. शाळेची भिंत कोसळून झालेल्या अपघातात आर्यन मंगेश कुरवाडे (६), सुर्यकांता मंगेश कुरवाडे (२६), नर्मदा लक्ष्मणराव कुरवाडे (६५), मंगेश लक्ष्मणराव कुरवाडे (३१), गजानन लक्ष्मणराव कुरवाडे (३४), अंबिका गजानन कुरवाडे (३०), , श्रेया गजानन कुरवाडे (१२) व सोनाली गजानन कुरवाडे (९), साक्षी गजानन कुरवाडे (१४) अशी भिंतीखाली दबून जखमी झालेल्यांची नावे आहेत.

शाळेच्या बाजूला मागील अनेक वर्षांपासून कुरवाडे कुटुंबीय वास्तव्यास आहे. दरम्यान रविवारी १३ जूनला सकाळी कुरवाडे कुटुंबीय साखरझोपेत असतानाच ही घटना घडली. परिसरात मागील दोन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे शाळेची शिकस्त असलेली भिंत कुटुंबीयांच्या घरावर पडली. त्यामध्ये पहाटेच्या वेळी साखरझोपेत असलेल्या कुरवाडे यांच्या कुटुंबातील नऊ सदस्य दबले गेले.

या घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी दुर्घटनेत जखमी झालेल्यांना उपचारासाठी मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये दाखल केले. वेळीच मदत मिळाल्यामुळे सुदैवाने मोठी घटना टळली. जिल्हा परिषद शाळेची शिकस्त झालेली भिंत कोणत्याही क्षणी पडू शकते, अशी तक्रार कुरवाडे कुटुंबियांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार करूनसुध्दा काही उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे हा अपघात घडल्याचं सांगण्यात येत आहे.

## बँकेतील चेक बनावटीकरून फसवणूक करणाऱ्या आरोपीस अटक करण्यात विरार पोलीस ठाणे यांना यश



दिनांक १३/०१/२०२१ रोजी १६.३० वा. ते दि. १४/०१/२०२१ रोजी सकाळी १०.३० वा. चे सुमारास स्टेट बक आफ इंडिया, शाखा मनवेलपाडा, विरार पूर्व ता वसई, जि. पालघर, येथे एक अनोळखी इसमाने फिर्यादीचे बकेतील ग्राहक संतोषकुमार व्हेलाल हा मीच आहे असे फिर्यादी व साक्षिदार यांना भासवुन त्याबाबत तोतयेगिरी करुन बंकेचे ग्राहक विजयकुमार व्हेलाल यांच्या मौल्यवान चेक क्रमांक ७१६२७७ मध्ये बनावटीकरन करुन तो चेक खरा आहे असे भासवुन बंकेतील ग्राहक नामे विजयकुमार व्हेलाल यांचे सेव्हींग अकाऊन्ट नंबर ११२१३४७८६५५ मधुन बरर चेक नंबर ७१६२७७ या व्दारे ४५,०००/ रुपये रोख रक्कम काढुन फिर्यादीचे बकेची व ग्राहकाची फसवणुक केलेली होती. सदर बाबत दिनांक ०४/०६/२०२१ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र ४८०/२०२१ भादंविस कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरील गुन्हयाप्रमाणे वाढत्या फसवणुकीचे गुन्हयाबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दखल घेऊन, सदरचा गुन्हा ऊघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे आरोपीची गुन्हे करण्याची कार्यपध्दती, तांञिक बाबी आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन पियुष ग्यानेंद्र शर्मा, वय ३४ वर्षे, रा. डी/३०३, रश्मी स्टारसीटी, आचोळे पार्कच्या जवळ, नालासोपारा (पू.), यास विरार पोलीस स्टेशनचे तपासी पथकाने दिनांक ०५/०६/२०२१ रोजी अटक केली असून त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. तसेच आरोपीचे अटके दरम्यान करण्यात आलेल्या तांत्रीक तपासामध्ये नमुद गुन्ह्याव्यतिरीक्त त्याचा इतर खालील नमुद एकुण ०७ फसवणुकीचे गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ४८०/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ अर्नाळा पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १७७/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४ अर्नाळा पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १७९/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४ नालासोपारा पोलीस ठाणे गु.नो.र.क्र. २३९/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२० नवघर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३९५/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२० माणिकपूर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३०५/२०१९, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४ माणिकपूर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २१८/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४१९, ४६५, ४६७, ४६८, ४७१ हर 0 7. 9८ 2० ० :० सदरची कामगीरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, श्रीमती रेणुका बागडे, सहा. पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोनि. विवेक सोनवणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. विजय दुबळा, जगदिश मराठे, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, पवन पवार यांनी केली आहे.

## 'या' जिल्ह्याला पावसाने झोडपलं; वीज पडून तिघांचा मृत्यू



यवतमाळ : राज्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच यवतमाळ जिल्ह्यालाही आज पावसाने झोडपून काढलं आहे. मात्र यावेळी जिल्ह्यात विविध ठिकाणी वीज पडल्याने तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

कळंब तालुक्यातील सावरगाव येथे अंगावर वीज कोसळून गजानन घोडे यांचा जागीच मृत्यू झाला तर यवतमाळ तालुक्यातील किन्ही येथील अशोक व्यवहारे (५५) यांचाही वीज कोसळल्याने मृत्यू झाला. तसेच दारव्हा तालुक्यातील कुंभारकिनी येथील शेतकरी आकाश जाधव (२८) यांच्या अंगावर वीज पडून तेही जागीच ठार झाले.

जिल्ह्यात दुपारी २ वाजताच्या दरम्यान जोरदार पावसाला सुरूवात झाली. दुपारची वेळ असूनही सर्वत्र अंधार झाल्याचे दृश्य दिसून आले. त्यामुळे रस्त्याने जाणाऱ्या वाहनांना हेडलाईट लावावे लागले होते.

यवतमाळ जिल्ह्यात बुधवार, ९ जून रोजी चांगला पाऊस बरसला. बुधवारी सर्वाधिक पाऊस दारव्हा तालुक्यात ३७.९ मिमी इतका कोसळला. त्या खालोखाल पुसदमध्ये ३३.७ मिमी, महागावमध्ये २२ मिमी, तर यवतमाळ तालुक्यात २४.६ मिमी पावसाची नोंद झाली. बुधवारी सकाळी १० वाजेपर्यंत जिल्ह्यात १५.७ मिमी पावसाची नोंद झाली होती. त्याचप्रमाणे जिल्ह्यात आज गुरूवारीही दुपारी २ वाजताच्या सुमारास वादळी पावसाने हजेरी लावली. जवळपास दोन तास मुसळधार पाऊस कोसळला. या पावसामुळे जवळपास १५०० हेक्टर जमीन खरडून गेल्याचा अंदाज आहे.

## वेश्या व्यवसायावर कारवाई करून 03 पिडित मुलींची केली सुटका

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध भायंदर कक्ष यांची कामगीरी



महिला नामे वैदेही उर्फ विभूती अशोककुमार राजगोर हि पुरुष गि-हाईकांकडुन पैसे स्विकारुन वेश्यागमनाकरीता नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान, भाईंदर (प.) या ठिकाणी वेश्यागमनाकरीता पुरुष गि-हाईकांस मुली पुरविणार असल्याची खाजीशिर गुप्त बातमी मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस. एस. पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी दि. १०.०६.२०२१ रोजी बोगस गि-हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन छापा टाकला असता महिला वेश्यादलाल वैदेही उर्फ विभूती राजगोर, वय ३० वर्षे ही वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्वीकारुन त्या मोबददल्यात मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने तिचेकडून वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०३ मुलींची सुटका करण्यात आली.

सदर बाबत महिला वेश्यादलाल व तिची साथीदार रेखा लांबा उर्फ दिदी यांच्या विरुध्द भाईंदर पोलीस ठाणे येथे पो.हवा./१९८७ विजय ढेमरे यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन भाईंदर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. 1 २३९/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला वेश्यादलाल वैदेही उर्फ विभूती अशोककुमार राजगोर, वय २८ वर्षे, रा. पी/६, गायत्री सोसायटी, बाब सिताराम मंदिराजवळ, गावदेवी कम्पाऊंड, मिरा गावठाण, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे मुळ रा. अहमदाबाद, गुजरात हि अल्पवयीन असतांना तिची सन २००६ मध्ये बोरीवली पोलीसांनी वेश्यावसायातुन सुटका केल्याचे व सदर बाबत तिची आई

१) सौ. रुपलबेंन दिनेशकुमार जोशी, मामा २) मकेश गोवर्धनदास ठक्कर, आजोबा ३) गोवर्धगदास जयराम ठक्कर व आजी ४) सौ. सुशिला गोवर्धनदास ठक्कर यांच्या विरुध्द बोरवली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र.५०/२००६, भादंविस कलम ३६६ (अ), ३७६,३२८,३४, सह पिटा अक्ट कलम ४, ५, ९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे प्रथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई डा. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./१९८७ विजय ढेमरे, पो.शि./३६६० केशव शिदे, म.पो.ना./२८४५ कमल चव्हाण, चालक पोना/२६३८ गावडे यांनी केली आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898